RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक ६०(४)] मंगळवार, एप्रिल २९, २०२५/वैशाख ९, शके १९४७ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १६२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ एप्रिल २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक एमटीएस-०३२२/प्र.क्र.१६९/पोल-४.– महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत केलेले सर्व नियम, काढलेले आदेश किंवा संलेख अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महाराष्ट्र पोलीस दलाच्या मोटार परिवहन विभागातील पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन, गट-ब (अराजपत्रित) या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासंबंधीचे पुढील नियम करीत आहे :–

**१.** या नियमांस, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महाराष्ट्र पोलीस दलाच्या मोटार परिवहन विभागातील पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन, गट - ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम, २०२५, असे म्हणावे.

**२.** या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,–

(क) " अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नियंत्रणाखालील अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालय, असा आहे ;

(ख) " सहायक पोलीस उप निरीक्षक (तांत्रिक) मो. प." याचा अर्थ, जो, महाराष्ट्र पोलीस मोटार परिवहन विभागात, मोटार वाहन जोडारी / यांत्रिक श्रेणी १, वीजतंत्री श्रेणी १, लोहार श्रेणी १, रंगारी श्रेणी १, कातारी श्रेणी १, सुतार श्रेणी १, संधाता श्रेणी १, आरेखक श्रेणी १, बॉडी बिल्डर जोडारी श्रेणी १, टेलर श्रेणी १, टायरमॅन श्रेणी १ यांपैकी एक पद धारण करणारा व सहायक पोलीस उप निरीक्षक तांत्रिक या पदावर किमान ०३ वर्षांचा अनुभव असणारा तांत्रिक अधिकारी (अंमलदार), असा आहे ;

(ग) " सहायक पोलीस उप निरीक्षक भांडारपाल मो.प." याचा अर्थ, जो, महाराष्ट्र पोलीस मोटार परिवहन विभागातील मोटार वाहन जोडारी/ यांत्रिक, वीजतंत्री, लोहार, रंगारी, कातारी, सुतार, संधाता श्रेणी १, आरेखक श्रेणी १, बॉडी बिल्डर फिटर, टेलर, टायरमॅन यामधील तांत्रिक अर्हता धारण करणारा आणि सहायक पोलीस उप निरीक्षक (भांडारपाल) या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण झालेला तांत्रिक अधिकारी (अंमलदार), असा आहे ;

(घ) " नियुक्ती प्राधिकारी " याचा अर्थ, शासकीय सेवेतील पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन, गट-ब या पदावर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असलेला अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे प्राधिकारी, असा आहे ;

(ङ) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे ;

(च) " पदविका " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेली पदविका, असा आहे ;

(छ) " महासंचालक " याचा अर्थ, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, असा आहे ;

(ज) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(झ) " शासकीय किंवा शासन अनुदानित किंवा विनाअनुदानित औद्योगिक प्रशिक्षण संस्था " याचा अर्थ, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेली संस्था, असा आहे ;

(ञ) " गृह विभाग " याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १६६ अन्वये केलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला विभाग, असा आहे ;

(ट) " अनुज्ञप्ती प्राधिकारी " याचा अर्थ, मोटार वाहन अधिनियम, १९९८ याच्या प्रकरण दोन अन्वये अनुज्ञप्ती देण्याकरिता प्राधिकृत केलेला प्राधिकारी, असा आहे ;

(ठ) " मर्यादित विभागीय परीक्षा समिती " याचा अर्थ, पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन (गट - ब अराजपत्रित) या पदावर मर्यादित विभागीय परीक्षा घेण्यासाठी अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस महासंचालक कार्यालयाने वेळोवेळी घटित केलेली समिती, असा आहे ;

(ड) " महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात आलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा,असा आहे.

**३. नियुक्तीचे मार्ग .-**

**(क) पदोन्नतीद्वारे.—** पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन, (गट-ब) (अराजपत्रित) या पदावरील नियुक्ती, उक्त कार्यालयात सहायक पोलीस उप निरीक्षक तंत्रज्ञ, गट-क किंवा सहायक पोलीस उप निरीक्षक, भांडारपाल, गट-क हे पद धारण करणाऱ्याआणि उक्त पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंडीत सेवा असणाऱ्या आणि लायसन प्राधिकाऱ्याने दिलेले जड वाहन चालविण्याचे लायसन धारण करणाऱ्या व्यक्तींमधून, मर्यादित विभागीय परीक्षा नियमांन्वये घेण्यात आलेल्या परीक्षेच्या निकालाच्या आधारे मर्यादित विभागीय परीक्षा समितीच्या शिफारशीवरून योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

**(ख) नामनिर्देशनाद्वारे.—**पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन (गट-ब) (अराजपत्रित) या पदावरील नियुक्ती, जे उमेदवार पुढील निकष पूर्ण करतात अशा, आयोगाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :-

**(एक) वयोमर्यादा .—**

**(क) किमान वयोमर्यादा.—** उक्त पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास बावीस वर्षे पूर्ण झालेले असावे ;

**(ख) कमाल वयोमर्यादा.—** उक्त पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी अडतीस वर्षांपेक्षा अधिक वय नसलेले आणि राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षांपेक्षा अधिक वय नसलेले.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता.—**किमान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा शासनाने मान्यता दिलेली समकक्ष परीक्षा धारण करणारी व्यक्ती ;

**(तीन) तांत्रिक अर्हता.—** शासनाने मान्यता दिलेली ऑटोमोबाईल किंवा यांत्रिक अभियांत्रिकी मधील पदविका किंवा पदवी धारण करणारी व्यक्ती ;

**(चार) शारिरीक पात्रता.—**

| अ. क्र. | शारीरिक पात्रता | स्त्री | पुरुष |
|---|---|---|---|
| १ | उंची | १५७ सेंटीमीटरपेक्षा कमी नसावी. | १६३ सेंटीमीटरपेक्षा कमी नसावी. |
| २ | छाती | | न फुगवता ७९ सेंटीमीटरपेक्षा कमी नसावी आणि न फुगवता व फुगवल्यानंतर यांमधील फरक ५ सेंटीमीटरपेक्षा कमी नसावा. |

**(पाच) अनुभव.—** शासकीय, निमशासकीय परिवहन संस्थेच्या किंवा प्रख्यात वाहन उत्पादकाने नेमलेल्या प्राधिकृत विक्रेतेच्या कार्यशाळेत वाहन दुरुस्ती व देखभाल करण्याचा किमान तीन वर्षांचा पूर्ण वेळ प्रात्यक्षिक पर्यवेक्षकीय अनुभव धारण केलेली व्यक्ती.

**(सहा) अनुभवाची गणना.—** वर नमूद केलेल्या अनुभवाची गणना नियम ३ (ख) (दोन) व ३ (ख) (तीन) यामध्ये नमूद अर्हतेच्या कालावधीनंतर करण्यात येईल :

परंतु, माजी सैनिकांसाठी, केंद्र सरकारच्या सेवेत सैनिक म्हणून काम करताना, प्राप्त केलेला अनुभव विचारात घेण्यात येईल.

**(सात) अतिरिक्त अर्हता.—** अशा व्यक्ती, लायसन प्राधिकाऱ्याने दिलेले अवजड वाहन प्रवर्गातील वाहन चालविण्याचे वैध लायसन धारण केलेले असावे.

**४.** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाची नियुक्ती, नियम ३ अन्वये भरण्यात यावयाच्या मंजूर पद संख्येच्या एकूण संख्येच्या, अनुक्रमे, ५०:५० या प्रमाणात करण्यात येईल :

परंतु, जर पदोन्नतीने नियुक्तीसाठी योग्य उमेदवार उपलब्ध झाला नाही तर, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेस अधीन राहून, त्या विशिष्ट नियुक्ती वर्षाकरिता, शिथिल करता येईल.

**५.** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात येईल.

**६. परिवीक्षा कालावधी.—** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, नियुक्तीच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या एक वर्षाच्या कालावधीसाठी परिवीक्षेवर असेल. नियुक्त केलेली व्यक्ती, या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे घेण्यात येणारे तीन महिन्यांचे मूलभूत प्रशिक्षण व परीक्षा व त्यानंतर नऊ महिन्यांचे तांत्रिक प्रशिक्षण व परीक्षा या दोन्ही पूर्ण करील. परिवीक्षा कालावधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यास निष्फळ ठरल्यास, परिणामी, कमाल एक वर्षाकरिता परिवीक्षा कालावधी वाढविण्यात येईल. जर अशी व्यक्ती, वाढविलेल्या परिवीक्षा कालावधीत परीक्षा उत्तीर्ण होण्यात निष्फळ ठरली तर, तिची सेवा समाप्त होण्यास पात्र असेल.

**७. हिंदी व मराठी भाषा परीक्षेसंबंधीची तरतूद .—**

**(क) पदोन्नतीद्वारे नियुक्तीसाठी.—** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी अगोदरच मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, शासनाने, त्या बाबतीत, वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत, मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील.

**(ख) नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी.—**नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, अगोदरच मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल तर, ती, शासनाने, त्या बाबतीत, वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत, मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, ती व्यक्ती, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**८. संगणक हाताळणी प्रमाणपत्र .—**

**(क) पदोन्नतीद्वारे नियुक्तीसाठी.—**नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाच्या व्यक्तीने, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी, संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून तिला सूट देण्यात आली नसेल तर, ती, शासनाने, वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील.

**(ख) नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी.—** नियम ३ मध्ये नमूद पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीने, संगणक प्रमाणपत्र धारण करण्यापासून तिला सूट देण्यात आली नसेल तर, ती, शासनाने, त्या बाबतीत वेळोवेळी केलेल्या नियमांद्वारे किंवा आदेशाद्वारे विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत धारण करील, अन्यथा, ती व्यक्ती, ते प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**९. लहान कुटुंबाचे घोषणापत्र.—**

(१) नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शिफारस केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ याच्या तरतुदींनुसार किंवा शासनाने याबाबत वेळोवेळी केलेले अन्य कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा कोणतेही संलेख यांनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकास, दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर तिला, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर नियमितपणे ठेवण्यासाठी अपात्र असेल.

**१०. बदली संबंधातील तरतूद.—**नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने नियुक्त केलेली व्यक्ती, राज्य स्तरावर ठेवण्यात आलेल्या सेवा ज्येष्ठता सूचीनुसार महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

**११. इतर आदेश / नियम लागू असणे.—** कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीपूर्वी किंवा त्यानंतर, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले कोणतेही नियम, किंवा निर्णय यांमध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. ता. भालवणे,**

दिनांक २९ एप्रिल २०२५, शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, Dated 29th April 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA POLICE ACT.

No. MTS.0322/C.R.169/POL-4.–In exercise of the powers conferred clause (*b*) of section 5 of the Maharashtra Police Act, (XXII of 1951), and in supersession of all existing rules, order or the instrument issued in this behalf, the Government of Maharashtra hereby make the following rules regulating recruitment to the post of Police Sub-Inspector Motor Transport, Group-B (Non-Gazetted) in the Motor Transport Department of Maharashtra Police under the Administrative control of the Home Department, Government of Maharashtra, namely :–

**1.** These rules may be called the Police Sub-Inspector Motor Transport, Group-B (Non-Gazetted) in the Motor Transport Department of Maharashtra Police under the Administrative control of Home Department, Government of Maharashtra (Recruitment) Rules, 2025.

**2.** In these rules, unless the context requires otherwise,–

(*a*) **"Additional Director General of Police and Director, Communication and Transport, Maharashtra State, Pune "** means Additional Director General of Police and Director, Communication and Transport, Maharashtra State, Pune of Maharashtra Police under the control of the Home Department ;

(*b*) **" Assistant Police sub-Inspector (Technical) M.T. "** means technical executives (Amaldar) who holding one of the posts of Motor vehicle fitter / Mechanic Grade 1, Electrician Grade 1, Blacksmith Grade 1, Painter Grade 1, Turner Grade 1, Carpenter Grade 1, Welder Grade 1, Draftsman Grade 1, Body Builder Fitter Grade 1, Tailor Grade 1, Tyreman Grade 1 and having minimum three years experience on the post of Assistant police sub inspector technician in Maharashtra police motor transport section ;

(*c*) **" Assistance Police Sub-Inspector Storekeeper M.T."** means technical executives (Amaldar) who holding one of technical qualification in Motor vehicle fitter, Mechanic, Electrician, Blacksmith, Painter, Turner, Carpenter, Welder Grade 1, Draftsman Grade 1, Body Builder fitter, Tailor, Tyreman and having minimum three years experience on the post of Assistant Police Sub-Inspector (Storekeeper) in Maharashtra police motor transport section;

(*d*) **" Appointing Authority "** means, Additional Director and Director, Communication and Transport, Maharashtra State, Pune, who is competent to appoint a candidate to the post of Police Sub-Inspector Motor Transport, Group-B in the Government service ;

(*e*) **" Commission "** means the Maharashtra Public Service Commission ;

(*f*) **" Diploma "** means a diploma awarded by Maharashtra State Board of Technical Education ;

(*g*) **" Director General "** means the Director General of Police, Maharashtra State, Mumbai ;

(*h*) **" Government "** means the Government of Maharashtra ;

(*i*) **" Government or Government Aided or Non-Aided Industrial Training Institute "** means institute recognized by the Directorate of Vocational Education and Training, New Delhi ;

(*j*) **" Home Department "** means the Department specified in the First Schedule; appended to the Maharashtra Government Rules of Business made under article 166 of the Constitution of India ;

(*k*) **" Licensing Authority "** means an authority empowered to issue licenses under Chapter II of the Motor Vehicle Act,1988 ;

(*l*) **" Limited Departmental Examination Committee "** means the Office of the Director General of Police under the Chairmanship of Additional Director General of Police and Director, Communications and Transport, Maharashtra State to conduct a limited departmental examination for the posts of Police Sub-Inspector Motor Transport (Group-B Non-Gazetted) The committee constituted from time to time ;

(*m*) **" Secondary School Certificate Examination "** means Secondary School Certificate Examination conducted by a Divisional Board constituted under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah XLI of 1965) ;

**3. Mode of Appointment.–**

*(a)* **By promotion.–** Appointment to the Post of Police Sub-inspector Motor Transport, (Group-B) (Non Gazetted) shall be made by promotion of a suitable person from amongst the person holding the post of Assistant Police Sub-Inspector Technician, Group-C or Assistant Police Sub-Inspector Storekeeper, Group-C, in the said office and having not less than three years regular and continuous service on the said post and possess a valid heavy vehicle driving license issued by the Licensing Authority, on the recommendation of the Limited Departmental Examination Committee on the basis of the results of the examination conducted under the Limited Departmental Examination Rules.

*(b)* **By nomination.–**Appointment to the post of Police Sub-Inspector Motor Transport, (Group-B) (Non-Gazetted) shall be made by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the competitive examination conducted by the Commission, who fulfills the following criteria, namely :–

*(i)* **Age Limit.–**

*(a)* **Lower Age Limit .–** Twenty-two years of age should be completed on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post ;

*(b)* **Upper Age Limit.–**Thirty-eight years of age completed for the persons not belonging to reserved categories and Forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post ;

*(ii)* **Minimum Educational Qualifications.–**A person holding a minimum Secondary School Certificate Examination or equivalent examination approved by Government ;

*(iii)* **Technical Qualification.–** A person holding Diploma or Degree in Automobile or Mechanical Engineering approved by the Government ;

*(iv)* **Physical Eligibility.–**

| Sr. No. | Physical Eligibility | Female | Men |
|---|---|---|---|
| 1 | Height | Not less than 157 cms. | Not less than 163 cms. |
| 2 | Chest | -------- | Shall not be less than 79 cms deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 cms. |

*(v)* **Experience.–**A person holding a minimum three years of experience in full time practical, supervisory experience of vehicle repair and maintenance in the workshop of Government, semi Government transport organization or authorized dealers appointed by renowned vehicle manufactures.

*(vi)* **Calculation of Experience.–**Calculation of the above mentioned experience shall be made after the period of qualification mention in rule 3(b) (ii) and 3 (b) (iii):

Provided that, for the ex-servicemen, the experience gained while working in the service of the Central Government as a solider will be taken into consideration.

*(vii)* **Additional qualification.–**A person shall possess a valid Driving License in the heavy vehicle category issued by the Licensing Authority.

**4.** Appointment to the posts mentioned in rule 3 by promotion and by nomination shall be made in the ratio of 50:50, respectively, for the total number of sanctioned posts to be filled under rule 3:

Provided that, in the event suitable candidates for appointment by promotion are not available, the ratio of appointment by promotion and nomination may be relaxed for that particular appointment year, subject to the approval of the Appointing Authority.

**5.** Appointments to the post mentioned in rule 3 shall be made with the approval of the Appointing Authority.

**6. Probation period.–**A person appointed by nomination to the post mention in rule 3 shall be on probation period for a period of one year commencing from the date of appointment. During this period, the person appointed shall undergo three months of basic training and examination, followed by nine months of technical training and examination, both conducted at the Maharashtra Police Academy, Nashik. Failure to pass the departmental examination during the probationary period shall result in an extension of the probationary period for a maximum of one year. If the individual fails to pass the examination within the extended probationary period, his services shall be liable to be terminated.

**7. Provision regarding Hindi and Marathi language examination.–**

*(a)* **For appointment by promotion.–**A person appointed to the post mentioned in rule 3 by Promotion shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations, before getting promotion to the said post.

*(b)* **For appointment by nomination.–**A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed the said examinations, He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passed those examinations.

**8. Certificate in Computer operation.–**

*(a)* **For appointment by promotion.–**A person appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall possess a Certificate of Computers Operations prescribed by the Government, from time to time , unless he has been exempted therefrom, before getting promoted to the said post.

*(b)* **For appointment by Nomination.–**A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall possess a Certificate of Computers Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possesses same.

**9. Declaration of small family.–**

(*1*) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rules 3 shall submit a declaration of Small Family as per the provision of the Maharashtra Civil

Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(*2*) A person having more than two children on the date of submission of Declaration of small family shall be disqualified for the appointment in Government Service.

(*3*) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

**10. Provision regarding transfer.–** A person appointed by nomination or promotion on the posts mentioned in rule 3 shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra, as the seniority list of the said post is maintained at State Level.

**11. Applicability of Other orders/rules.–** The terms and conditions specified by the Government in any rules, or resolutions issued by the Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government servant shall also be applicable to the concerned Government servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. T. BHALWANE,
Deputy Secretary to Government.

Date : 29th April 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.